जा.क्र./विप्र-७/शेतीशाळा/ 1120 /१९
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००५
दिनांक: 28/०५/२०१९

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक --------------
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-----------

**विषय: खरीप हंगाम २०१९ मध्ये राबवावयाच्या पिकनिहाय क्रॉपसॅप संलग्न शेतकरी शेती शाळा - आयोजनासंबंधी मार्गदर्शक सुचना व त्या अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत..**

सन २०१८-१९ मध्ये खरीप हंगामपांसून क्रॉपसॅप कार्यक्रम कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचा-यांमार्फत सर्वदूर राबविण्यात आला होता, राज्यामध्ये हा कार्यक्रम अत्यंत चांगल्या पध्दतीने राबविण्यात आला. कार्यपध्दतीतील बदलामुळे कापूस पिकावरील गुलाबी बोंड अळीचा प्रभावीरितीने नियंत्रण करण्यात यश मिळाले शेतकऱ्यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहचविणे व सुधारीत तंत्रज्ञानाच्या अवलंब करण्यासाठी शेतकरी शेतीशाळा हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. याच धर्तीवर क्रॉपसॅप संलग्न शेतीशाळा ही संकल्पना खरीप २०१९ पासुन भात, कापुस, सोबयाबीन, तुर,मका, ज्वारी, उस व हरभरा या पीकांसाठी राबवायच्या आहेत.

त्यानुषंगाने खरीप हंगाम २०१९ मध्ये राबवावयाच्या पिकनिहाय क्रॉपसॅप संलग्न शेतकरी शेती शाळा आयोजनासंबंधी मार्गदर्शक सुचना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. त्यानुसार क्रॉपसॅप संलग्न शेतकरी शेती शाळा राबविण्यासंबंधी प्रभावी अमंलबजावणीबाबत संबंधितांनी कार्यवाही करावी.

सोबत: १) मार्गदर्शक सुचना
२) परिशिष्ट अ व ब

(विजय घावटे)
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

# शेतक-यांची शेतीशाळा खरीप हंगाम २०१९ मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना-** सन २०१८-१९ मध्ये खरीप हंगामपासून क्रॉपसॅप कार्यक्रम कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचा-यांमार्फत सर्वदूर राबविण्यात आला होता, राज्यामध्ये हा कार्यक्रम अत्यंत चांगल्या पध्दतीने राबविण्यात आला. कार्यपध्दतीतील बदलामुळे कापूस पिकावरील गुलाबी बोंड अळीचा प्रभावीरितीने नियंत्रण करण्यात यश मिळाले हे आपणास माहीतच आहे. तसेच क्रॉपसॅप कार्यक्रमामध्ये क्षेत्रीय कर्मचा-यांचा सहभाग मोठया प्रमाणावर वाढल्यामुळे शेतक-यांच्या शेतावर क्षेत्रीय कर्मचा-यांच्या भेटी वाढून शेतक-यांना प्रत्यक्ष सल्ला देण्यात आल्यामुळे शेतक-यांचा क्षेत्रीय कर्मचा-याच्या प्रति विश्वास वाढण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे विविधस्तरावरुन देण्यात आलेले कृषि तंत्रज्ञान तसेच विविध संदेश शेतक-यापर्यंत परिणामकारकपणे पोहोचविणे शक्य झाले आहे. याचा परिणाम स्वरुप ग्राम पातळीवरील कृषि विभागाची उपस्थिती ठळकपणे दिसून येत होती. केवळ किड व रोगांचा सल्ला प्रभावीपणे शेतक-यांपर्यंत पोहोचल्यामुळे कृषि विभागाची प्रतिमा उंचावण्यात चांगला परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये विविध पिकासंदर्भात तांत्रिक मार्गदर्शनाची जोड मिळाल्याने त्याचा परिणाम अनेक पटीने वाढण्यास मदत झाली आहे. या पार्श्वभुमीवर शेतक-यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहचविणे व सुधारीत तंत्रज्ञानाच्या अवलंब करण्यासाठी शेतकरी शेतीशाळा हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे.

**उद्देश-** क्षेत्रीय स्तरावर पिकनिहाय तंत्रज्ञान व त्यासंबंधित कौशल्ये शेतक-यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रत्येक कृषि सहाय्यकाकडे व कृषि पर्यवेक्षकांकडे शेतीशाळांचे आयोजन होणे अत्यंत आवश्यक आहे. क्रॉपसॅप व शेतीशाळा यांची सांगड घातल्यास क्षेत्रीय कर्मचा-यांचे ज्ञान,कौशल्ये व वेळ याचा सुयोग्य वापर करुन घेणे शक्य होणार आहे. क्षेत्रीय पातळीवर आत्मा कार्यक्रमांतर्गत अेटीएम,बीटीएम व शेतीमित्र हे सुध्दा कृषि विस्ताराच्या कार्यक्रमामध्ये कार्यरत आहे. कृषि विभागातील नियमित क्षेत्रीय कर्मचारी व आत्मातंर्गत कार्यरत अेटीएम, बीटीएम आणि शेतीमित्र यांचा योग्य समन्वय साधल्यास कृषि विस्तार कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे ग्रामपातळीपर्यंत एकत्रीपणे राबविणे सहज शक्य आहे. विस्तार कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी क्रॉपसॅप संलग्न शेतीशाळा ही संकल्पना खरीप २०१९ हंगामापासून प्रमुख ८ पिकांसाठी राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये १) भात २) कापूस ३) सोयाबीन ४) तूर ५) मका ६) ज्वारी ७) ऊस व ८) रब्बी मध्ये हरभरा या प्रमुख पिकांचा समावेश करण्यात येत आहे.

## १) विभागनिहाय शेतीशाळा घ्यावयाची पीके -

| | | |
|---|---|---|
| कोकण विभाग | : | १) भात |
| नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर विभाग | : | १) भात २) कापूस ३) सोयाबीन ४) तूर ५) मका ६) ज्वारी ७) ऊस ८) रब्बी हरभरा |
| औरंगाबाद, लातूर, अमरावती विभाग | : | वर नमूद केलेली सर्व पिके(भात सोडून) |

## २) शेतीशाळा प्रशिक्षण-

सदरची संकल्पना विभागीय जिल्हा तसेच गाव पातळीपर्यंत पोहोचविण्यासाठी विभागातून एक समन्वयक अशा आठ समन्वयकाचे प्रशिक्षण राज्यस्तरावर घेण्यात आले व त्यांनी पुढील विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील प्रशिक्षणाचे नियोजन करुन शेतकरी शेतीशाळेची संकल्पना गाव पातळीपर्यंत पोहोचविण्याचे काम देण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणासाठी विभागातील ज्या कर्मचा-यांनी शेतकरी शेतीशाळामध्ये तज्ञ प्रवर्तकाचे (फॅसिलीटेटर) प्रशिक्षण घेतले आहे व ज्यांना शेतकरी शेतीशाळा राबवण्याचा अनुभव आहे अशा कर्मचा-यांना सदर कार्यक्रमाची संकल्पना समजावून सांगितली. विभागीयस्तरावरील प्रशिक्षणाच्या वेळी जिल्हानिहाय व तालुकानिहाय घ्यावयाच्या प्रशिक्षणाबाबतचे नियोजन निश्चित केले. विभागीय कृषि सह संचालक यांनी काटेकोर नियोजन करुन तालुकास्तरापर्यंतचा सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम ३० एप्रिल २०१९ पर्यंत पूर्ण केला आहे.

क्रॉपसॅप अंतर्गत मास्टर ट्रेनरचे प्रशिक्षण कृषि विद्यापिठाच्या स्तरावर आयोजित करण्यात येतील. सदरचे प्रशिक्षण हे क्रॉपसॅपची निरीक्षणे सुरु होण्यापूर्वीच पूर्ण करावयाची आहे. अनुभवी प्रशिक्षकांचा चमु तयार करुन त्यांचे मार्फत तालुक्यातील शेतकरी शेतीशाळांना मार्गदर्शन करावे.

## ३) शेतीशाळेचे आयोजन

कृषि सहायक व कृषि पर्यवेक्षकाच्या कार्यक्षेत्रातील एका गावाची निवड करावी व या गावात खरीप व रब्बी हंगामामध्ये घेतल्या जाणा-या भात, कापुस, सोयाबीन, तुर, हरबरा, मका, ऊस व ज्वारी या प्रमुख प्रमुख पिकाकरीता शेतक-यांचे शेतीशाळेचे आयोजन करण्यात यावे. प्रत्येक शेतीशाळेसाठी गावामध्येच उपलब्धतेनुसार एक गट पिक प्रात्यक्षीकाचे आयोजन करुन त्या ठिकाणी पिक हंगामामध्ये आवश्यकतेनुसार दर १५ दिवसांनी शेतीशाळा वर्गाचे आयोजन करावयाचे आहे.

## ४) गाव व प्रक्षेत्र निवड-

- गाव हा घटक निश्चित करुन त्या क्षेत्रातील खरीप/रब्बी हंगामामध्ये घेतल्या जाणा-या वरील सामाविष्ठ पिकांपैकी एका प्रमुख पिकांची निश्चिती करावी.
- प्रमुख पिक निवड करताना खरीप व रब्बी हंगामामध्ये त्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये पेरणी होणा-या क्षेत्रापैकी ७० टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी होणा-या प्रमुख पिकाचा समावेश करावा.
- पोक्रा योजनेंतर्गत आयोजित केल्या जाणा-या शेतीशाळा या पोक्रांतर्गत करार तत्वावरिल कर्मचा-यामार्फ़त आयोजित करण्यात येत असल्याने ती गावे वगळुन कार्यक्षेत्रातील इतर गावातुन कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांनी शेतीशाळेचे आयोजन करावे.

- कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षकांमार्फत प्रत्येकी एका गावामध्ये शेतकरी शेतीशाळा राबवावी.

- क्रॉपसॅप अंतर्गत मागील वर्षी फिक्स्ड प्लॉटसाठी निवडलेल्या गावात व सर्वात जास्त क्षेत्र असलेल्या पिकासाठी शेतीशाळा राबविण्याचे नियोजन करावे. याचा आराखडा विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर तयार करुन दयावा.

- शेतक-यांना प्रत्येक शेतीशाळा वर्गामध्ये प्रात्यक्षिक दाखवावयाचे असल्याने प्रयोगशील शेतक-याचे प्रक्षेत्र जे गावापासून जवळ आणि शेतक-यांना जाणे येणे सोयीचे व्हावे अशा ठिकाणी निवडावे. केवळ जाणे येणे सोयीचे नसल्याने शेती शाळा वर्गामध्ये शेतक-यांची उपस्थिती अपेक्षेप्रमाणे राहत नाही याची जाणीव ठेवून प्रक्षेत्राची निवड करावी.

- शेतीशाळा प्लॉटवरील तंत्रज्ञानाचा तौलनिक अभ्यास करता यावा आणि शेती शाळेतील शेतक-यांना सदर तंत्रज्ञान अवलंब करण्याबाबत निर्णय घेता यावा यासाठी शेतीशाळा प्लॉट शेजारीच नियंत्रित प्लॉट असणे आवश्यक आहे.

- शेतीशाळा प्लॉट धारकाकडे शेतीशाळा प्लॉटसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा असणे अभिप्रेत आहे.

## ५) अमंलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना-

५.१) क्षेत्रीय स्तरावर कृषि सहाय्यकाने त्यांचे कार्यक्षेत्रातील क्रॉपसॅप अंतर्गत निवड केलेल्या गावांमध्ये एका प्रमुख पिकासाठी फिक्स प्लॉट निवडून शेतीशाळा आयोजन करावी व शक्यतो क्रॉपसॅप निरिक्षणाचे दिवशी शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे. प्रशिक्षकाचे गरजेनुसार त्यांना क्रॉपसॅप अंतर्गत निवड केलेल्या फिक्स प्लॉट व्यतीरीक्त इतर प्लॉटवर शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करता येईल.

५.२) कृषि पर्यवेक्षक यांनी त्यांचे अधिनस्त कृषि सहाय्यकांनी घेतलेली गावे वगळून एका गावामध्ये शेतीशाळाचे आयोजन करावे.

५.३) महिला कर्मचा-यांनी महिला शेतक-यांच्यासाठी प्राधान्याने शेतीशाळाचे आयोजन करावे.

५.४) ज्या योजनामध्ये शेतीशाळासाठी नियमित तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे अशा शेतीशाळा यापूर्वी प्रशिक्षित केलेल्या शेतीशाळा तज्ञ प्रर्वतकामार्फत आयोजित करण्यात याव्यात.

५.५) जेथे नियमित योजनेतून शेतीशाळा उपलब्ध होणार नाही अशा गावामध्ये कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षकांमार्फत क्रॅापसॅप योजनेच्या तरतुदी मधुन मधून शेतीशाळा घेण्यात येईल.

५.६) गाव हा घटक निश्चित करुन त्या क्षेत्रातील खरीप/रब्बी हंगामामध्ये घेतल्या जाणा-या प्रमुख पिकांची निश्चिती करावी.

५.७) प्रमुख पिक निवड करताना खरीप व रब्बी हंगामामध्ये त्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये एकुण पेरणी होणा-या क्षेत्रापैकी ७० टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी होणा-या प्रमुख पिकाचा समावेश करावा.

५.८) शेतीशाळेसाठी निवड केलेला शेतकरी सर्व घटकांची स्वतः अमंलबजावणी करु शकेल अशाच शेतक-याची निवड करावी.

५.९) प्रत्येक शेतीशाळासाठी शेतकरी व क्षेत्र निवड करताना खालील बाबी विचारात घाव्यात.

५.१०.१) सदरहू प्रात्यक्षिक क्षेत्रावरच शेतक-यांचे प्रशिक्षण तथा शेतीशाळेचा वर्ग घ्यावयाचा असल्याने सदरचे क्षेत्र रस्त्यालगत असावे.

५.१०.२) निवड करावयाचा लाभार्थी हा प्रगतशील शेतकरी असावा ज्याने निश्चित करुन दिलेल्या सर्व बाबीची अमंलबजावनी प्रथम स्वखर्चाने करावी.

५.१०.३) शेतक-याने स्वतः सर्व बाबीची नोंदी करुन ठेवाव्यात. (रेकॉर्ड नोंदवही)

५.१०) संबंधीत गावामध्ये निवड केलेल्या प्रात्यक्षिक क्षेत्रावर पीक हंगाम कालावधीत शेतिशाळेचे आयोजन करण्यात यावे. त्यासाठी पीकाच्या वाढीच्या आवस्थेनुसार दर १५ दिवसांनी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे.

५.११) शेतीशाळेतील प्रशिक्षण वर्गासाठी किमान २५ शेतकरी निवड करावी. ही निवड करतांना महिला शेतक-यांचा समावेश करावा. तसेच हे शेतकरी संपुर्ण शेतीशाळेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५.१२) विविध योजनेतंर्गत उपलब्ध होणारी पीक प्रात्यक्षिके ही शेतीशाळेशी निगडीत राबवावीत व शेतीशाळेत सहभागी होणा-या शेतक-यांना संबंधित योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रात्यक्षिकाचा लाभ द्यावा. तसेच केंद्र व राज्य पुरस्कृत योजनामध्ये उपलब्ध असलेल्या इतर बाबींचा लाभ प्राधान्याने त्यांना देण्यात यावा.

५.१३) शेतीशाळेतील प्रत्येक प्रशिक्षण वर्गाचा कालावधी किमान २ तास ठेवावा. यामध्ये आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष डेमो तथा प्रशिक्षण या माध्यमातुन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण कृषि सहाय्यकाने संबंधित शेतक-यांना त्या आठवड्यातील पिक परिस्थितिनुसार योग्य सल्ला तसेच पिकावरिल प्रमुख किड व रोगांची ओळख व त्यावरील उपाययोजना याबाबतमाहिती द्यावी. याबरोबरच त्या त्या वेळेचे कृषि संदेश, योजनांची माहिती या शेतीशाळेचे माध्यमातुन शेतक-यांना द्यावी.

५.१४) शेतीशाळेसाठी कार्यक्षेत्रात उपलब्ध असलेल्या ग्रामीण कृषि कार्यानुभव (RAWE) **मधील** कृषि पदवीच्या अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घेण्यात यावा.

५.१५) म.कृ.अ ,ता.कृअ, उवि.कृ.अ, यांनी किमान एका शेतीशाळेस अचानक भेट देवुन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करावे.

५.१६) **शेतीशाळाद्वारे शेतक-यापर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी खालील चार महत्वाचे टप्पे पाडलेले आहेत.(पिकनिहाय या टप्प्यांमध्ये वाढ होऊ शकते)**

**१. पेरणीपूर्वः** जमीन तयार करणे, समतल मशागत, जागच्या जागी पाणी मुरविण्याची व्यवस्था करणे, खरीप हंगामासाठी त्या पिकासाठी योग्य अशा पिक वाणाची निवड करणे.

**१ अ. रोपवाटीका-** भात पिकांसाठी

**२. पेरणीच्या वेळीः** बियाणे प्रक्रिया करणे, पेरणी पध्दती, रुंद सरा वरंबा पध्दतीचा वापर करणे, पट्टा पध्दतीने पेरणी करणे, विविध खताचा पहिला हप्ता देणे, तण नियंत्रणसाठी तणनाशकाचा वापर यावर भर देण्यात येईल.

**३. पिक वाढीच्या अवस्थाः** हा टप्पा दीर्घकालासाठी असल्याने यामध्ये योग्य प्रकारे आंतर मशागत, तणव्यवस्थापन, किड व रोग नियंत्रण, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पिकासाठी पाणी व्यवस्थापन यामध्ये जीवसंरक्षक सिंचनाचा अंतर्भाव राहील.

**४. काढणीच्या वेळी व काढणीत्तर व्यवस्थापनः** यामध्ये काढणीची योग्य वेळ व पध्दती, काढणीनंतर त्याला वाळविणे, सफासफाई करणे, ग्रेडींग करणे योग्य पध्दतीने साठवणूक करणे इत्यादी बाबींचा समावेश राहील.

वर उल्लेख केलेल्या विविध टप्प्यामध्ये जे तंत्रज्ञान व कौशल्ये शेतक-यापर्यंत पोहोचवयाचे आहे.त्यासाठी तांत्रिक साहित्य विभागीय स्तरावर तयार करण्यात यावे. जेणेकरुन विभागनिहाय पिकांसाठीची आवश्यकता विचारात घेऊन हे दर्जेदार तांत्रिक प्रचार साहित्य तयार करण्यात यावे. हे सर्व तांत्रिक साहित्य शेतीशाळेचा पहिला वर्ग सुरु होण्यापूर्वी कृषि सहाय्यकापर्यंत प्रशिक्षणाद्वारे पोहोचेल याची दक्षता विभागीय कृषि सह संचालक यांनी घेणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक ती मदत आयुक्तालयस्तरावरुन करण्यात येईल.

## ६) शेतीशाळांच्या अंमलबजावणीमध्ये अधिकारी/ कर्मचा-यांच्या जबाबदा-या

६.१ **कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक**

६.१.१ सदर शेतीशाळा आयोजनाची जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांची राहील व संबधित गावातील शेतकरी मित्र आयोजनामध्ये स्थानिक आवश्यक ती सर्व मदत उदा. शेतकरी एकत्रित करणे, बैठक व्यवस्था करणे इ. कामे करतील.

६.१.२ कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांनी गाव, क्षेत्र निवडीसाठी मुद्या क्र.४ मधील ६.३.१ मार्गदर्शक सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

६.१.३ कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक हे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे विभागिय कृषि सहसंचालक यांनी निश्‍चित केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे आयोजन करतील, आवश्यकता भासल्यास शेतक-यांच्या गरजा स्थानिक परिस्थिती व पीक परिस्थितीनुसार किरकोळ बदल करतील.

६.१.४ शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाची यशोगाथा तयार करणे.

६.१.५ शेतीदिन साजरा करणे व त्यामध्ये सहभागी शे्तक-यांना अनुभव कथन करण्यास प्रवृत्त करणे.

६.१.६ mCROPSAP ॲप किंवा इतर निर्देशित ॲपव्दारे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे प्रत्यक्ष ठिकाण, वेळ व अहवालाची नोंदणी करणेची जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांची राहील.

**६.२ मंडळ कृषि अधिकारी**

६.२.१ मंडळातील शेतीशाळांचे आयोजनासाठी पीक, गाव व वार निश्‍चित करणे.

६.२.२ मंडळ कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांच्या शेतीशाळेस वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करावे. तसेच पुर्ण हंगामात मंडळातील सर्व शेतीशाळंचा अंर्तभाव होईल अशा रीतीने मंडळातील सर्व शेतीशाळा भेटीचें नियोजन करावे.

६.२.३ मंडळात निवड केलेल्या शेतक-यांची यादी अंतिम करणे.

६.२.४ मंडळाच्या कार्यक्षेत्रातील प्रशिक्षण देण्याची क्षमता असलेल्या अनुभवी प्रगतशिल शेतकरी तसेच सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांची यादी तयार करुन आवश्यकतेनुसार त्यांच्या सेवा शेतीशाळा प्रशिक्षण वगासाठी घेण्याचे नियोजन करावे

६.२.५ mCROPSAP ॲपव्दारे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे भेटीच्या वेळी प्रत्यक्ष ठिकाण, वेळ, फोटो,व अहवालाची नोंदणी करावी.

६.२.६ मंडळ कृषि अधिकारी यांनी शेतीशाळेसाठी लागणा-या गुणवत्तापुर्ण प्रशिक्षण साहीत्याचा वेळेत पुरवठा करणे.

६.२.७ शेतीशाळेसाठी आवश्यक साहित्य बाबी कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांना उपलब्ध करुन देणे.

**६.३ तालुका कृषि अधिकारी**

६.३.१ तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व मंडळातील ५०% शेतीशाळा प्रशिक्षण वर्गास पुर्ण हंगामात किमान एकदा भेट देऊन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करावे. भेटीचे वेळी mCROPSAP ॲपव्दारे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे प्रत्यक्ष ठिकाण, वेळ, फोटो,व अहवालाची नोंदणी करावी.

६.३.२ तालुका कृषि अधिकारी यांनी यांनी शेतीशाळेसाठी लागणा-या गुणवत्तापुर्ण प्रशिक्षण साहीत्याचा पुरवठा करावा.

६.३.३ क्षेत्रिय कर्मचा-यांनी खर्च करुन सादर केलेली देयके वेळेत RTGS ने त्वरीत कृषि पर्यवेक्षक, कृषि सहायक यांना अदा करणेबाबतची कार्यवाही करणे.

## ६.४ उपविभागिय कृषि अधिकारी

६.४.१ उपविभागिय कृषि अधिकारी यांनी उपविभागातील सर्व तालुक्यातील १० % शेतीशाळा प्रशिक्षण वगार्स किमान एकदा भेट देवुन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करावे.भेटीदरम्यान mCROPSAP ॲपव्दारे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे प्रत्यक्ष ठिकाण, वेळ, फोटो,व अहवालाची नोंदणी करावी.

६.४.२ उपविभागिय कृषि अधिकारी यांनी शेतीशाळेसाठी लागणारे सर्व तांत्रिक साहित्याचा पुरवठा सॉफ्ट कॉपीद्वारे करणे.

६.४.३ अधिनस्त तांत्रिक कर्मचा-यांच्या मदतीने प्रशिक्षण साहित्य निर्माण करणे उदा. किडी व मित्र किडींचे सॉफ्ट टॉइज, रेखाचित्र, मॉडेल इ.

६.४.४ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांना कृषि विज्ञान केंद्र, कृषि विद्यापिठातील शास्त्रज्ञांच्या भेटीचे आयोजन करुन तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे.

६.४.५ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांसाठी वेगवेगळया निधीतून देण्यात आलेले अनुदान नियमितपणे खर्चाचा आढावा घेऊन क्षेत्रिय कर्मचारी यांनी स्वखर्चाने केलेल्या बाबींची प्रतिपुर्ती देयके वेळेत पारीत करण्याबाबतचे सनियंत्रण करणे.

६.४.६ कार्यक्षेत्रातील यशस्वीपणे राबविण्यात येत असलेल्या शेतीशाळेची माहिती वेळोवेळी तज्ञांच्या मदतीने दृक-श्राव्य स्वरुपातील माहीती सामाजिक माध्यमाव्दारे प्रसिध्दी करणे.

## ६.५ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

६.५.१ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हयातील ३ % शेतीशाळांना सर्व तालुक्यातून समप्रमाणात किमान एकदा अचानक भेट देवुन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करावे.भेटीचे वेळी mCROPSAP ॲपव्दारे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे प्रत्यक्ष ठिकाण, वेळ, फोटो,व अहवालाची नोंदणी करावी.

६.५.२ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांसाठी वेगवेगळया निधीतून देण्यात आलेले अनुदान नियमितपणे खर्चाचा आढावा घेऊन क्षेत्रिय कर्मचारी यांनी स्वखर्चाने केलेल्या बाबींची प्रतिपुर्ती देयके त्वरीत पारीत करण्याबाबतचे सनियंत्रण करणे.

६.५.३ जिल्ह्यातील सर्व कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक तसेच शेतकरी मित्र यांना शेतीशाळे संदर्भात प्रशिक्षण देण्याचे नियोजन करावे

**६.६ विभागिय कृषि सहसंचालक**

६.६.१ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांची कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक निहाय गावे व पीके निश्चित करणे.

६.६.२ विभागामध्ये राबविल्या जाणा-या शेतीशाळांचे कृषि हवामान निहाय, पीक निहाय वेळापत्रक व प्रशिक्षण विषयक गरजा व तांत्रिक माहीती निश्चित करुन सुसुत्रता आणणे.

६.६.३ विभागातील पीक निहाय गाव निहाय शेतीशाळांचा आराखडा तयार करुन नियोजन करावे.

६.६.४ विभागातील तालुका निहाय उत्पादन वाढीची सुत्रे निश्चित करुन त्याचा प्रशिक्षण वर्गात समावेश करणे.

६.६.५ जिल्हानिहाय तज्ञ प्रशिक्षकांचा चमु निवडणे व सर्व तालुक्यातून निवडक अधिकारी /कर्मचा-यांना शेतीशाळाविषयक प्रशिक्षण वर्ग विभागस्तरावर आयोजित करणे.

६.६.६ विभागातील सर्व जिल्हयातील कमीत कमी १ % शेतीशाळेस अचानक भेट देवुन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करावे.भेटी दरम्यान mCROPSAP ॲपव्दारे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे प्रत्यक्ष ठिकाण, वेळ, फोटो,व अहवालाची नोंदणी करावी.

६.६.७ प्राचार्य रामेतीच्या मदतीने पिकनिहाय शेतीशाळेशी निगडीत तांत्रिक अभ्यासक्रम निवडून कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देणे.

**६.७** मंडळ कृषि अधिकारी ते आयुक्त कृषि यांचेकडे किमान एका शेतीशाळेचे पालक अधिकारी म्हणुन जबाबदारी राहील व त्यासाठी सदर शेतीशाळेच्या प्रत्येक प्रशिक्षण वर्गास त्यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन करावे. शेतीशाळेच्या भेटीदरम्यान mCROPSAP ॲपव्दारे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी मंडळ कृषि अधिकारी ते विभागिय कृषि सहसंचालक या सर्वांची राहील.

**६.८** आयुक्तालयस्तरावर राज्यात राबविल्या जाणा-या सर्व शेतीशाळांचे सनियंत्रण करणे व वेळोवेळी आढावा घेण्याची जबाबदारी राहील.

## ७) शेतीशाळा प्रशिक्षकासाठी प्रशिक्षण संच-

शेतीशाळा वर्गामध्ये प्रशिक्षक आणि शेतकरी यांना निरीक्षणे घेण्यासाठी (AESA) आणि सदर शिक्षणपद्धती परिणामकारक होण्यासाठी काही प्रशिक्षण साहित्याची आवश्यकता असते. यासाठी आवश्यक असणा-या साहित्याची उदा. रजिस्टर, फुटपट्टी, कोरे व ड्रॉइंग कागद, स्केच पेन सेट, १०X भिंग, लहान व्हायल्स इत्यादींची उपलब्धता तालुका कृषि अधिकारी यांनी शेतीशाळा प्रशिक्षण वर्ग सुरु होण्यापुर्वी (हंगामपुर्व) करून दयावी. प्रशिक्षण साहित्य या बाबी अंतर्गत सदरचा खर्च करण्यात यावा.

## ८) शेतीशाळेतील पिकांच्या उत्पादनाच्या नोंदी-

शेतकरी शेतीशाळेच्या माध्यमातून पीकासंदर्भातील सर्व बाबींच्या माहितीव्दारे उत्पादन/ उत्पन्न वाढीबाबत प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन करावे. तसेच शेतक-यांना हंगामातील पीकाचे उत्पादन खर्च काढण्यासाठी प्रवृत्त करावे. यामध्ये रोजंदारीच्या मनुष्यबळ व बैल शक्तीचा वापर, यंत्राचा वापर, बी-बीयाणे, सेंद्रिय व रासायनिक खते, जलसिंचन,पीक संरक्षण, खेळत्या भांडवलावरील व्याज हा प्रत्यक्ष तर जमिनीचा खंड व घसारा, कुटुंबातील मनुष्यबळ मजुरी इ. बार्बीवरील खर्च हा अप्रत्यक्ष ठरतो. त्यानुषंगाने या सर्व बाबींवरील खर्चाचा विचार पीक उत्पादन खर्च काढतांना करावा. पीक उत्पादन खर्च काढण्याकरीता नोंदवही ठेवणे बाबत शेतक-यांना प्रवृत्त करावे.

## ९) शेतीदिन-

शेतीशाळेमध्ये अवलंब केलेल्या तंत्रज्ञानाचा  व्यापक प्रचार करणेसाठी प्रत्येक गावसमूहामध्ये पीक वाढीच्या शेवटच्या टप्प्यात एक दिवसीय शेतीदिनाचे आयोजन करावे. यासाठी  कृषि विद्यापीठ/ कृषि विज्ञान केंद्र/ कृषि संशोधन केंद्र /कृषि महाविद्यालय येथील तज्ञांना तंत्रज्ञानाबद्दल माहिती देण्यासाठी आमंत्रित करावे. शेतीदिनामध्ये किमान ५० टक्के महिलांचा सहभाग होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. शेतीदिनामध्ये शेतीशाळेतील प्रशिक्षणार्थींना त्यांचे अनुभव कथन करण्यास प्रवृत्त करावे तसेच कोणते तंत्रज्ञान जास्त उपयुक्त ठरले याबाबत चर्चा घडवून आणावी. शेतीदिनासाठी प्रती शेतीशाळा निर्धारित केलेला निधी गावसमूह स्तरावर एकत्रित करून विहित वित्तिय नियमानुसार खर्च करण्यात यावा.

## १०  उत्कृष्ट शेतीशाळा आयोजन स्पर्धा.

उत्कृष्ट शेतीशाळा स्पर्धा आयोजित केल्याने कर्मचा-यामध्ये खिलाडू वृत्ती वाढुन त्यांच्या मधिल सुप्त गुणांना चालना देण्याच्या उद्देशाने जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात यावे. उत्कृष्ट शेतीशाळा स्पर्धा आयोजित केल्याने कर्मचा-यामध्ये उत्साहाची भावना निमार्ण होऊन योजनेचा उद्देश सफल होण्यास मदत होते. त्यादृष्टीने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील स्पर्धेमध्ये सहभागी होवू इच्छिणा-या कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांना अवाहन करुन त्यांचे अर्ज शेतीशाळेच्या प्रथम टप्प्यात मागविण्यात यावे.

उपविभाग निहाय प्राप्त अर्जांची छाननी करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक, तंत्र अधिकारी व लेखाधिकारी यांचे पथकामार्फत संबधित शेतीशाळांचे मुल्यांनकन करावे. जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट काम करणा-या कृषि सहाय्यक /कृषि पर्यवेक्षक यांचे प्रथम, व्दितीय व तृतीय पारीतोषीकासाठी गुणांकन करावे. विभागस्तरावर विभागिय अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली विभागिय सांख्यिक, तंत्र अधिकारी, कृषि अधिकारी यांचे चमू मार्फत अधिनस्त जिल्ह्यातील प्रथम मानांकित शेतीशाळांचे मुल्यांनकन करुन विभागपातळीवर कृषि सहाय्यक /कृषि पर्यवेक्षक यांचे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक निश्चित करावे. विभागस्तरावरुन राज्यपातळीवर प्राप्त झालेल्या शेतीशाळांचे प्रथम, व्दितीय व तृतीय स्थानासाठी मुल्यांनकन करावे.

पारितोषीकासाठी लागणारी रक्कम क्रॉपसॅप अंतर्गत किंवा इतर निधीतून उपलब्ध करुन देण्यात येईलः-

१. जिल्हास्तरावरील प्रथम क्रमांकासाठी रु.५०००/-, व्दितीय क्रमांकासाठी रु.३०००/- व तृतीय क्रमांकासाठी रु.२०००/- चे पारितोषीक व प्रशस्तीपत्रक देण्यात यावे.
२. विभागपातळीवरील प्रथम क्रमांकासाठी रु.१००००/-, व्दितीय क्रमांकासाठी रु.८०००/- व तृतीय क्रमांकासाठी रु.७०००/- चे पारितोषीक व प्रशस्तीपत्रक देण्यात यावे.
३. राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकासाठी रु.१५०००/-, व्दितीय क्रमांकासाठी रु.१३०००/- व तृतीय क्रमांकासाठी रु.११०००/- चे पारितोषीक व प्रशस्तीपत्रक देण्यात यावे.

## ११ शेतकरी शेतीशाळेसाठी निधीची तरतूद-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान/गळीत धान्य अभियान, राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत भात बियाणे साखळी विकास कार्यक्रम, आत्मा या योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. प्राधान्याने केंद्र शासनाकडुन प्राप्त निधी प्रथम वापरण्याचे नियोजन करावे. या योजनेतंर्गत सन २०१९-२० मध्ये उपलब्ध होणारी तरतुदीचा तपशिल सोबत ‘‘परिशिष्ट ब’’ जोडण्यात आलेला आहे. तद्नंतर शेतीशाळा राबवण्यासाठी कमी पडणारा निधी क्रॉपसॅप या राज्य योजनेतून वापरण्यात यावा.विविध योजनेच्या निधीतून राबविण्यात येणा-या शेतीशाळेसाठी रुपये १४०००/- प्रती शेतीशाळा याप्रमाणे आर्थिक मापदंड वापरण्यात यावा.

केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनातंर्गत शेतकरी प्रशिक्षणासाठी ही तरतुद उपलब्ध आहे.सदरची तरतुद शेतीशाळेसाठी वरील मापदंडाप्रमाणे खर्च करावी.

### ११.१ शेतक-यांची शेतीशाळा बाबीसाठी खर्चाचे मापदंड-

| क्रॉपसॅप संलग्न शेतकरी शेतीशाळा | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **उपक्रम/ बाब** | **युनिट** | **मापदंड (रु)** |
| १ | प्रशिक्षण साहित्य व इतर तांत्रिक साहित्य | प्रती शेतकरी २००/- रुपये | ५००० |
| २ | अल्पोपहार (२५ शेतकरी, १० वर्ग) | प्रती शेतकरी २०/- रुपये | ५००० |
| ३ | शेती दिन खर्च | - | २००० |
| ४ | विश्लेषणात्मक अहवाल तयार करणे. | - | २००० |
| | **एकुण** | | **१४०००** |

## १२) शेतकरी शेतीशाळा सनियंत्रण व अभिलेख –

कृषि सहायक, कृषि पर्यवेक्षक यांनी शेतीशाळेसंबंधित अभिलेख सोबत जोडलेल्या ‘‘परिशिष्ट अ’’ नुसार त्यांचेस्तरावर ठेवण्यात यावेत. वरिष्ठ स्तरावरील अधिका-यांनी सदरचे प्रपत्रात आपले कार्यक्षेत्रातील शेतीशाळेचा नियमित आढावा घेऊन अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावेत.

# शेतीशाळा अहवाल – परिशिष्ट अ

१) दिनांक ---------------अखेरपर्यंत नियोजीत व प्रत्यक्ष आयोजित केलेल्या शेतीशाळेचा सविस्तर तपशिल

कृषि सहाय्यक / कृषि पर्यवेक्षक

| तालुका | कृषि सहायक /कृ.प. मुख्यालय | कृषि सहायक / कृ.प नाव | पीक | शेतीशाळा वर्ग क्र. | नियोजीत दिनांक | आयोजीत दिनांक | विषय | विशेषज्ञ (वक्ता) नाव | उपस्थित अधिकारी पदनाम | उपस्थित शेतकरी संख्या | शेरो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

---

२) दिनांक ---------------अखेरपर्यंत नियोजीत व प्रत्यक्ष आयोजित केलेल्या शेतीशाळेचा गोषवारा

| विभाग | जिल्हा | तालूका | पीक | नियोजीत शेतीशाळा संख्या | आयोजीत शेतीशाळा संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

परिशिष्ट ब

## सन २०१९-२०, सोयाबीन शेतीशाळा (राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान :गळीतधान्य निगडीत)

## जिल्हानिहाय / बाबनिहाय कार्यक्रम (रु हजार)

| अ. क्र. | जिल्हा/विभाग | सोयाबीन गटप्रात्यक्षिके (भौ:प्रती प्रात्याक्षिक १० हेक्टर क्षेत्राप्रमाणेसंख्या , आ: रु. ६,०००/ हे.) | | शेतकरी प्रशिक्षण (@ रु. २४,०००/-प्रशिक्षण) | | शेतकरी शेतीशाळा (@ रु. १४,०००/-शेतीशाळा) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सोयाबीन | | सोयाबीन | |
| | | भौतिक (संख्या) | आर्थिक | भौतिक (संख्या) | आर्थिक | भौतिक (संख्या) | आर्थिक |
| १ | २ | १२ | १३ | २० | २१ | २० | २१ |
| १ | नाशिक | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २ | धुळे | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **नाशिक विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| ३ | अहमदनगर | १२५ | ७५००.०० | ५ | १२०.०० | ४१ | ५७४.०० |
| ४ | पुणे | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **पुणे विभाग** | | **१२५** | **७५००.००** | **५** | **१२०.००** | **४१** | **५७४.००** |
| ५ | सांगली | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **कोल्हापुर विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| ६ | बीड | १५० | ९०००.०० | ५ | १२०.०० | ४९ | ६८६.०० |
| **औरंगाबाद विभाग** | | **१५०** | **९०००.००** | **५** | **१२०.००** | **४९** | **६८६.००** |
| ७ | लातुर | १३० | ७८००.०० | ५ | १२०.०० | ४३ | ६०२.०० |
| ८ | उस्मानाबाद | १२५ | ७५००.०० | ४ | ९६.०० | ४१ | ५७४.०० |
| ९ | नांदेड | १७५ | १०५००.०० | ७ | १६८.०० | ५८ | ८१२.०० |
| १० | हिंगोली | ६५ | ३९००.०० | २ | ४८.०० | २१ | २९४.०० |
| ११ | परभणी | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **लातूर विभाग** | | **४९५.००** | **२९७००.००** | **१८.००** | **४३२.००** | **१६३.००** | **२२८२.००** |
| १२ | बुलढाणा | १७५ | १०५००.०० | ७ | १६८.०० | ५८ | ८१२.०० |
| १३ | अकोला | ९५ | ५७००.०० | ३ | ७२.०० | ३१ | ४३४.०० |
| १४ | वाशिम | १०० | ६०००.०० | ४ | ९६.०० | ३३ | ४६२.०० |
| १५ | अमरावती | २२० | १३२००.०० | ८ | १९२.०० | ७३ | १०२२.०० |
| १६ | यवतमाळ | २०५ | १२३००.०० | ८ | १९२.०० | ६८ | ९५२.०० |
| **अमरावती विभाग** | | **७९५** | **४७७००.००** | **३०** | **७२०.००** | **२६३** | **३६८२.००** |
| १७ | वर्धा | १०५ | ६३००.०० | ४ | ९६.०० | ३४ | ४७६.०० |
| १८ | नागपुर | १५० | ९०००.०० | ६ | १४४.०० | ५० | ७००.०० |
| १९ | चंद्रपुर | १०० | ६०००.०० | ४ | ९६.०० | ३३ | ४६२.०० |
| **नागपूर विभाग** | | **३५५** | **२१३००.००** | **१४** | **३३६.००** | **११७** | **१६३८.००** |
| **एकुण** | | **१९२०** | **११५२००.००** | **७२** | **१७२८.००** | **६३३** | **८८६२.००** |
| आयुक्तालय स्तर | | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **एकूण महाराष्ट्र** | | **१९२०** | **११५२००.००** | **७२** | **१७२८.००** | **६३३** | **८८६२.००** |

परिशिष्ट ब

सन २०१९-२० राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - पौष्टिक तृणधान्य (ज्वारी/ बाजरी/नाचणी) व भरडधान्य (मका )

जिल्हानिहाय व पिकनिहाय पिक प्रात्यक्षिके व प्रशिक्षण कार्यक्रम

| अ.क्र. | जिल्हा | सन २०१९-२० राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - पौष्टिक तृणधान्य (ज्वारी/ बाजरी/नाचणी) | | | | | | | | | | सन २०१९-२० राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - भरडधान्य मका रक्कम रु. हजारात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | समूह पिक प्रात्याक्षिके (१० हेक्टर मध्ये) | | | | | | | | पिक पद्धतीवर आधारित प्रशिक्षण | | पिक प्रात्यक्षिके ( मका ) (१० हेक्टर मध्ये) | | | | | |
| | | ज्वारी | | बाजरी | | नाचणी | | एकूण | | | | सुधारित पिक पध्दती | | अंतर पिक प्रात्याक्षिके (मका + तूर /मका + सोयाबीन) | | एकूण | |
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | ठाणे | ०.० | ०.० | ०.० | ०.० | १०.० | ६००.० | **१०.०** | **६००.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २ | पालघर | ०.० | ०.० | ०.० | ०.० | २०.० | १२००.० | **२०.०** | **१२००.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| ३ | रायगड | ०.० | ०.० | ०.० | ०.० | १८.० | १०८०.० | **१८.०** | **१०८०.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| ४ | रत्नागिरी | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ३०.० | १८००.० | **३०.०** | **१८००.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| **ठाणे विभाग** | | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **७८.०** | **४६८०.०** | **७८.०** | **४६८०.०** | **४.०** | **५६.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** |
| ५ | नाशिक | २.० | १२०.० | ९०.० | ५४००.० | ४०.० | २४००.० | **१३२.०** | **७९२०.०** | ३.० | ४२.० | ४४.९ | २६९२.० | २०.० | १२००.० | ६४.९ | ३८९२.० |
| ६ | धुळे | ८.० | ४८०.० | ६५.० | ३९००.० | ०.० | ०.० | **७३.०** | **४३८०.०** | २.० | २८.० | ३०.० | १८००.० | २०.० | १२००.० | ५०.० | ३०००.० |
| ७ | नंदुरबार | १०.० | ६००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **१०.०** | **६००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| ८ | जळगाव | २०.० | १२००.० | १५.० | ९००.० | ०.० | ०.० | **३५.०** | **२१००.०** | २.० | २८.० | ५०.० | ३०००.० | २०.० | १२००.० | ७०.० | ४२००.० |
| **नाशिक विभाग** | | **४०.०** | **२४००.०** | **१७०.०** | **१०२००.०** | **४०.०** | **२४००.०** | **२५०.०** | **१५०००.०** | **९.०** | **१२६.०** | **१२४.९** | **७४९२.०** | **६०.०** | **३६००.०** | **१८४.९** | **११०९२.०** |
| ९ | अहमदनगर | १२३.० | ७३८०.० | ९०.० | ५४००.० | ०.० | ०.० | **२१३.०** | **१२७८०.०** | ३.० | ४२.० | २५.० | १५००.० | १०.० | ६००.० | ३५.० | २१००.० |
| १० | पुणे | ७०.० | ४२००.० | २०.० | १२००.० | ११.९ | ७१६.० | **१०१.९** | **६११६.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| ११ | सोलापूर | १३०.० | ७८००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **१३०.०** | **७८००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| **पुणे विभाग** | | **३२३.०** | **१९३८०.०** | **११०.०** | **६६००.०** | **११.९** | **७१६.०** | **४४४.९** | **२६६९६.०** | **७.०** | **९८.०** | **२५.०** | **१५००.०** | **१०.०** | **६००.०** | **३५.०** | **२१००.०** |
| १२ | सातारा | ४०.० | २४००.० | ४०.० | २४००.० | १०.० | ६००.० | **९०.०** | **५४००.०** | ३.० | ४२.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| १३ | सांगली | ६०.० | ३६००.० | ३५.० | २१००.० | ०.० | ०.० | **९५.०** | **५७००.०** | २.० | २८.० | २५.० | १५००.० | १०.० | ६००.० | ३५.० | २१००.० |
| १४ | कोल्हापूर | ५०.० | ३०००.० | ०.० | ०.० | ३५.० | २१००.० | **८५.०** | **५१००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| **कोल्हापूर विभाग** | | **१५०.०** | **९०००.०** | **७५.०** | **४५००.०** | **४५.०** | **२७००.०** | **२७०.०** | **१६२००.०** | **७.०** | **९८.०** | **२५.०** | **१५००.०** | **१०.०** | **६००.०** | **३५.०** | **२१००.०** |
| १५ | औरंगाबाद | ३०.० | १८००.० | ३०.० | १८००.० | ०.० | ०.० | **६०.०** | **३६००.०** | ३.० | ४२.० | ५०.० | ३०००.० | २०.० | १२००.० | ७०.० | ४२००.० |
| १६ | जालना | २०.० | १२००.० | २०.० | १२००.० | ०.० | ०.० | **४०.०** | **२४००.०** | २.० | २८.० | २५.० | १५००.० | ७.२ | ४३२.० | ३२.२ | १९३२.० |
| १७ | बीड | ८०.० | ४८००.० | ८०.० | ४८००.० | ०.० | ०.० | **१६०.०** | **९६००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| **औरंगाबाद विभाग** | | **१३०.०** | **७८००.०** | **१३०.०** | **७८००.०** | **०.०** | **०.०** | **२६०.०** | **१५६००.०** | **७.०** | **९८.०** | **७५.०** | **४५००.०** | **२७.२** | **१६३२.०** | **१०२.२** | **६१३२.०** |
| १८ | लातूर | ३०.० | १८००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **३०.०** | **१८००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| १९ | ओस्मानाबाद | ५०.० | ३०००.० | १५.० | ९००.० | ०.० | ०.० | **६५.०** | **३९००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २० | नांदेड | ३०.० | १८००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **३०.०** | **१८००.०** | ३.० | ४२.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २१ | परभणी | ५०.० | ३०००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **५०.०** | **३०००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २२ | हिंगोली | १५.० | ९००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **१५.०** | **९००.०** | २.० | २८.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| **लातूर विभाग** | | **१७५.०** | **१०५००.०** | **१५.०** | **९००.०** | **०.०** | **०.०** | **१९०.०** | **११४००.०** | **११.०** | **१५४.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** |
| २३ | बुलढाणा | ८.० | ४८०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **८.०** | **४८०.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २४ | अकोला | ५.० | ३००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **५.०** | **३००.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २५ | वाशीम | ५.० | ३००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **५.०** | **३००.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २६ | अमरावती | ६.० | ३६०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **६.०** | **३६०.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| २७ | यवतमाळ | १०.० | ६००.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **१०.०** | **६००.०** | १.० | १४.० | | ०.० | | ०.० | ०.० | ०.० |
| **अमरावती विभाग** | | **३४.०** | **२०४०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **३४.०** | **२०४०.०** | **५.०** | **७०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** |
| **एकूण** | | **८५२.०** | **५११२०.०** | **५००.०** | **३००००.०** | **१७४.९** | **१०४९६.०** | **१५२६.९** | **९१६१६.०** | **५०.०** | **७००.०** | **२४९.९** | **१४९९२.०** | **१०७.२** | **६४३२.०** | **३५७.१** | **२१४२४.०** |

परिशिष्ट ब

| अ. क्र. | जिल्हा / विभाग | आद्यरेषिय प्रात्यक्षिके (कापूस पिकात आंतरपिके - मुग, उडीद) रु. ८०००/- प्रति हेक्टर | | कापसाच्या देशी वाणांची अतीघन लागवड पध्दतीची प्रात्यक्षिके रु. १००००/- प्रति हेक्टर | | राज्यस्तरीय अधिकारी -कर्मचारी प्रशिक्षण २० प्रशिक्षणार्थी २ दिवस (रू.४००००/- प्रति प्रशिक्षण) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **(रक्कम रु. लाखात)** |
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | धुळे | १० | ०.८० | ४० | ४.०० | ० | ०.०० |
| २ | जळगांव | १० | ०.८० | ११० | ११.०० | ० | ०.०० |
| **नाशिक वि.** | | **२०** | **१.६०** | **१५०** | **१५.००** | **०** | **०.००** |
| ३ | अहमदनगर | १० | ०.८० | २० | २.०० | १ | ०.४० |
| **पुणे वि.** | | **१०** | **०.८०** | **२०** | **२.००** | **१** | **०.४०** |
| ४ | औरंगाबाद | १० | ०.८० | ९० | ९.०० | ० | ०.०० |
| ५ | जालना | १० | ०.८० | ६० | ६.०० | ० | ०.०० |
| ६ | बीड | १० | ०.८० | ८० | ८.०० | ० | ०.०० |
| **औरंगाबाद वि.** | | **३०** | **२.४०** | **२३०** | **२३.००** | **०** | **०.००** |
| ७ | नांदेड | १० | ०.८० | ७० | ७.०० | ० | ०.०० |
| ८ | परभणी | १० | ०.८० | ६० | ६.०० | १ | ०.४० |
| **लातुर वि.** | | **२०** | **१.६०** | **१३०** | **१३.००** | **१** | **०.४०** |
| ९ | बुलढाणा | १० | ०.८० | ५० | ५.०० | ० | ०.०० |
| १० | अकोला | १० | ०.८० | ३० | ३.०० | १ | ०.४० |
| ११ | वाशिम | १० | ०.८० | १० | १.०० | ० | ०.०० |
| १२ | अमरावती | १० | ०.८० | ४० | ४.०० | ० | ०.०० |
| १३ | यवतमाळ | २० | १.६० | ९० | ९.०० | ० | ०.०० |
| **अमरावती वि.** | | **६०** | **४.८०** | **२२०** | **२२.००** | **१** | **०.४०** |
| १४ | वर्धा | १० | ०.८० | ४० | ४.०० | ० | ०.०० |
| १५ | नागपूर | १० | ०.८० | ३० | ३.०० | ० | ०.०० |
| १६ | चंद्रपूर | १० | ०.८० | ३० | ३.०० | ० | ०.०० |
| **नागपूर वि.** | | **३०** | **२.४०** | **१००** | **१०.००** | **०** | **०.००** |
| **राज्य एकुण** | | **१७०** | **१३.६०** | **८५०** | **८५.००** | **३** | **१.२०** |

परिशिष्ट ब

| कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वाणिज्यिक पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१९-२० चे जिल्हानिहाय नियोजन | | | | | | (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बाब | | | | |
| अ.क्र. | जिल्हा | एक डोळा पध्दतीने/ पट्टा पध्दतीचा अवलंब व आंतरपीक प्रात्यक्षिके ( रु.९०००/- हे.) | | राज्यस्तरीय प्रशिक्षण (रु.४००००/- प्रति प्रशिक्षण) | | एकूण |
| | | **भौतिक** | **आर्थिक** | **भौतिक** | **आर्थिक** | **आर्थिक** |
| १ | अहमदनगर | ५४० | ४८.६० | ० | ०.०० | ४८.६० |
| २ | पुणे | ६६० | ५९.४० | ० | ०.०० | ५९.४० |
| ३ | सोलापूर | ७५० | ६७.५० | ० | ०.०० | ६७.५० |
| विभागीय स्तर | | ० | ०.०० | १ | ०.४० | ०.४० |
| **पुणे विभाग** | | **१९५०** | १७५.५० | **१** | **०.४०** | **१७५.९०** |
| ४ | सातारा | ३२० | २८.८० | ० | ०.०० | २८.८० |
| ५ | सांगली | ३७५ | ३३.७५ | ० | ०.०० | ३३.७५ |
| ६ | कोल्हापूर | ७४० | ६६.६० | ० | ०.०० | ६६.६० |
| विभागीय स्तर | | | ०.०० | १ | ०.४० | ०.४० |
| **कोल्हापूर विभाग** | | **१४३५** | १२९.१५ | **१** | **०.४०** | **१२९.५५** |
| ७ | औरंगाबाद | ८० | ७.२० | ० | ०.०० | ७.२० |
| ८ | जालना | ९० | ८.१० | ० | ०.०० | ८.१० |
| ९ | बीड | १९० | १७.१० | ० | ०.०० | १७.१० |
| विभागीय स्तर | | ० | ०.०० | १ | ०.४० | ०.४० |
| **औरंगाबाद विभाग** | | **३६०** | ३२.४० | **१** | **०.४०** | **३२.८०** |
| १० | लातूर | १९० | १७.१० | ० | ०.०० | १७.१० |
| ११ | उस्मानाबाद | २०० | १८.०० | ० | ०.०० | १८.०० |
| १२ | नांदेड | ८० | ७.२० | ० | ०.०० | ७.२० |
| १३ | परभणी | १२० | १०.८० | ० | ०.०० | १०.८० |
| १४ | हिंगोली | ५० | ४.५० | ० | ०.०० | ४.५० |
| विभागीय स्तर | | ० | ०.०० | १ | ०.४० | ०.४० |
| **लातूर विभाग** | | **६४०** | ५७.६० | **१** | **०.४०** | **५८.००** |
| आयुक्तालय स्तर | | ० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | | **४३८५** | **३९४.६५** | **४** | **१.६०** | **३९६.२५** |

**परिशिष्ट ब**

**राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) शेतीशाळा जिल्हानिहाय कार्यक्रम**

**२०१९-२०** (रु.लाखात)

| अ.क्र. | जिल्हाचे नांव | आत्मा अंतर्गत शेतीशाळा | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | |
| १ | ठाणे | ३२ | ४.४८ | |
| २ | पालघर | ५० | ७.०० | |
| २ | रायगड | ९२ | १२.८८ | |
| ३ | रत्नागिरी | ५४ | ७.५६ | |
| ४ | सिंधुदुर्ग | ५० | ७.०० | |
| **ठाणे विभाग** | | **२७८** | **३८.९२** | |
| ५ | नासिक | ९५ | १३.३० | |
| ६ | धुळे | २४ | ३.३६ | |
| ७ | नंदुरबार | ३६ | ५.०४ | |
| ८ | जळगाव | ९५ | १३.३० | |
| **नाशिक विभाग** | | **२५०** | **३५.००** | |
| ९ | अ.नगर | ८४ | ११.७६ | |
| १० | पुणे | ८० | ११.२० | |
| ११ | सोलापूर | ७० | ९.८० | |
| **पुणे विभाग** | | **२३४** | **३२.७६** | |
| १२ | सातारा | ७१ | ९.९४ | |
| १३ | सांगली | ६५ | ९.१० | |
| १४ | कोल्हापूर | ७७ | १०.७८ | |
| **कोल्हापुर विभाग** | | **२१३** | **२९.८२** | |
| १५ | औरंगाबाद | ५९ | ८.२६ | |
| १६ | जालना | ४८ | ६.७२ | |
| १७ | बीड | ७१ | ९.९४ | |
| **औरंगाबाद विभाग** | | **१७८** | **२४.९२** | |
| १८ | लातूर | ६५ | ९.१० | |
| १९ | उस्मानाबाद | ४८ | ६.७२ | |
| २० | नांदेड | ९८ | १३.७२ | |
| २१ | परभणी | ५९ | ८.२६ | |
| २२ | हिंगोली | ३५ | ४.९० | |
| **लातुर विभाग** | | **३०५** | **४२.७०** | |
| २३ | बुलढाणा | ७८ | १०.९२ | |
| २४ | अकोला | ४२ | ५.८८ | |
| २५ | वाशिम | ३६ | ५.०४ | |
| २६ | अमरावती | ८४ | ११.७६ | |
| २७ | यवतमाळ | ९६ | १३.४४ | |
| **अमरावती विभाग** | | **३३६** | **४७.०४** | |
| २८ | वर्धा | ५२ | ७.२८ | |
| २९ | नागपूर | ८३ | ११.६२ | |
| ३० | भंडारा | ४७ | ६.५८ | |
| ३१ | गोंदिया | ५२ | ७.२८ | |
| ३२ | चंद्रपूर | ९५ | १३.३० | |
| ३३ | गडचिरोली | ७७ | १०.७८ | |
| **नागपुर विभाग** | | **४०६** | **५६.८४** | |
| **एकूण** | | **२२००** | **३०८.००** | |

टिप: रक्कम रु. १४०००/शेतीशाळा